सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी नियमित करणेबाबत.
श्री. विलास द. मारणे, लेखा अधिकारी.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
02 JUL 2026
प्राप्त झाले सही........

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:-संलेको-२०२६/प्र.क्र.१०१/१६८३८६७/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २९ जून, २०२६.

**संदर्भ**:- १. सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको/प्रशा-राप/का-६/श्री. मारणे/ ५.२६/६५४/५६८/२५९४, दि.१५.०५.२०२६,

२.शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको/२०२५/प्र.क्र.१३९/कोषा-प्रशा-२ दि.३०/०३/२०२६.

३. जिल्हा कोषागार अधिकारी सातारा यांचे आदेश क्र. कोष/सातारा/आस्था-१/श्री मारणे कार्यमुक्त/०३/२०२६/१२०४. दि. ३०/०३/२०२६.

४. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास पुणे यांचे पत्र क्र. प्रादुविअ/पुणे/अ-४वे न/श्री पाडेकर / बदली-कार्यमुक्त/५८२/२०२६. दिनांक-३०/०३/२०२६

५. प्रादेशिक सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र. सहसंलेको/पुणे/आस्था-३/ मविलेसे (राप)/ प्रतिक्षाधीन /०३/२०२६/११२१ दि. ३१/०३/२०२६.

६. प्रादेशिक सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र. सहसंलेको/पुणे/आस्था-३/सेनि/श्री मारणे/०३/२०२६/११३३ दि. ३१/०३/२०२६.

-: **शासन आदेश** :-

संदर्भ क्र. २ येथील आदेशान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक लेखा अधिकारी गट ब (राजपत्रित) संवर्गातून श्री. विलास द. मारणे यांची महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी गट ब (राजपत्रित) संवर्गात लेखा परीक्षा अधिकारी, प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास, पुणे या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली.

२. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा यांचे दि.३०.०३.२०२६ च्या आदेशानुसार श्री. मारणे यांना उपकोषागार अधिकारी, वाई या पदावरुन कार्यमुक्त केले होते. त्यानुसार श्री. मारणे दि. ३०/०३/२०२६ रोजी सायंकाळी ७.१५ वाजता प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास पुणे यांचे कार्यालयात हजर होण्यासाठी पोहचले असता सदर कार्यालयाने लेखा अधिकारी पद रिक्त नसल्याने त्यांना हजर न करुन घेत असल्याचे लेखी पत्र दि. ३०/०३/२०२६ रोजी दिले.

३. त्यानुसार प्रादेशिक सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांच्या दि. ३१.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये श्री. मारणे यांना पदस्थापनेच्या प्रतिक्षेत दि. ३१.०३.२०२६ रोजी रूजू करून घेण्यात आले.

01317/2026/1771
03-07-26

४.	श्री. मारणे हे दि. ३१.०३.२०२६ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत असल्याने, प्रादेशिक सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांच्या दि. ३१.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये त्यांना दि. ३१.०३.२०२६ (म.नं) पासून शासन सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले आहे.

५.	श्री. विलास द. मारणे यांचा प्रतिक्षाधीन कालावधी खालीप्रमाणे आहे:-

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.३१.०३.२०२६ | १ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत कार्यरत |
| **एकूण** | **१ दिवस** | |

६.	म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) च्या तरतुदीनुसार शासकीय कर्मचाऱ्याला नियमित पदस्थापनेचे आदेश मिळेपर्यंत जेवढ्या कालावधीपर्यंत सक्तीने वाट पहावी लागते तो कालावधी “कर्तव्य” कालावधी समजण्यात येतो. सबब, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) च्या तरतूदीनुसार, श्री. विलास द. मारणे, लेखा अधिकारी यांचा दि.३१.०३.२०२६ या १ दिवसाचा प्रतिक्षाधीन कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

७.	यास्तव, श्री. विलास द. मारणे, लेखा अधिकारी, लेखा अधिकारी यांना ३१.०३.२०२६ या १ दिवसाच्या नियमित करण्यात आलेल्या प्रतिक्षाधीन कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहायक संचालक, सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. र. पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) सहायक संचालक, सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे,*
६) संबंधित लेखा अधिकारी,*
७) संबंधित अधिकाऱ्याचे कार्यालय प्रमुख,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)